महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४० पोट-कलम (१ब) च्या अन्वये मल्टी-मॉडेल इंटरनॅशनल हब एअरपोर्ट (मिहान) अधिसुचित क्षेत्र.

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन अधिसूचना क्र.टिपीएस-२४१६/शिकाना-४१/प्र.क्र.७५/२०१७/नवि-९**
**मंत्रालय, मुंबई-३२.**
**दिनांक- २० एप्रिल, २०१७.**

**शासन निर्णय:-** सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्रात प्रसिद्ध करावी.

***महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.***

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

(रा. शा. चौहान)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

**१)** मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव मंत्रालय मुंबई.
**२)** मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई.

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
२. जिल्हाधिकारी, नागपूर.
३. आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
४. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर.
५. संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या. मुंबई.
७. विभागीय सहसंचालक नगररचना, नागपूर विभाग, नागपूर.
८. सहायक संचालक नगररचना, नागपूर शाखा, नागपूर.
(त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत अधिसूचनेच्या अनुषंगाने अधिप्रमाणीत करण्यात यावयाच्या नियोजन प्रस्तावाच्या प्रत्येकी पाच प्रती शासनास विहीत मार्गाने सादर करण्यात याव्यात)
९. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण राजपत्राच्या नागपूर विभागीय पुरवणीमध्ये प्रसिद्ध करुन तिच्या प्रत्येकी पाच प्रती या विभागास व संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पाठवाव्यात.)
१०. कक्ष अधिकारी, (नवि-२९)
(त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी प्रस्तुत जाहिर अधिसूचना वेबसाईटवर प्रसिद्ध करावी).
११. निवडनस्ती, कार्यासन नवि-०९.

C:\2014-2015\Kalam\मिहान प्र.क्र.75-17.docx

# महाराष्ट्र शासन

**नगर विकास विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक- २० एप्रिल, २०१७.**

**अधिसूचना**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

**क्र.टिपीएस-२४१६/शिकाना-४१/प्र.क्र.७५/२०१७/नवि-९:** ज्याअर्थी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित (यापुढे उक्त " महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी" असे संबोधले आहे) ही कंपनी, कंपनी अधिनियम, १९५६ अन्वये संस्थापित झाली आहे, व महाराष्ट्र शासनाच्या नियंत्रणाखाली कार्य करीत आहे ;

आणि ज्याअर्थी, महारा ष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा.क्र.३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे) याच्या कलम ४० च्या पोट-कलम १ (ब) अन्वये नागपूर जिल्हयातील नागपूर शहरी, नागपूर ग्रामीण व हिंगणा तालुक्यातील काही गावातील ५०२१.२३ हेक्टर क्षेत्राकरिता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस नागपूर येथील मल्टी-मॉडेल इंटरनॅशनल हब एअरपोर्ट (यापुढे उक्त "मिहान अधिसुचित क्षेत्र" असे संबोधले आहे) यांची "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्ती केली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसुचना क्र. टिपीएस-२४१४/३८६/ प्र.क्र.२३०/२०१४/नवि-९ दि. २३ डिसेंबर, २०१४ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम-४० च्या उप-कलम (१) आणि (१ब) आणि कलम १६० च्या उप - कलम (१) सह महाराष्ट्र जनरल क्लॉज ॲक्ट, १९०४ अन्वये उक्त मिहान अधिसूचित क्षेत्रातील ७३९.४१ हेक्टर क्षेत्र वगळून, त्या क्षेत्रासाठी नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांना विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने उक्त मिहान अधिसुचित क्षेत्रापैकी २२०.२१ हेक्टर क्षेत्र सोडुन ४०६१.४७ हेक्टर आर क्षेत्रासाठी उक्त अधिनियमाच्या कलम-४० च्या पोटकलम (३) च्या खंड (ड) चे उपखंड (२) अन्वये दि. ९ जुलै, २०१५ अन्वये नियोजन प्रस्ताव शासनाचे नगर विकास विभागास मान्यतेसाठी सादर केला आहे (यापुढे उक्त "नियोजन प्रस्ताव" असे संबोधले आहे) उक्त अधिनियमाच्या कलम-४० च्या पोटकलम (३) च्या खंड (ड) चे उपखंड (२) द्वारे समाविष्ट केलेला कलम ११५ च्या पोट-कलम (३) अन्वये उक्त नियोजन प्रस्तावास शासनाने अधिसूचना क्र.टिपीएस-२४१५/ २५५/प्र.क्र.२३६/२०१४/नवि-९, दि. १ मार्च, २०१७ अन्वये मंजूरी प्रदान केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने उक्त मिहान अधिसुचित क्षेत्रासाठी नियोजन प्रस्ताव तयार करताना मौजा-शिवणगांव, जयताळा, भामटी आणि इसासनी मधील २२०.२१ हेक्टर (यापुढे उक्त "क्षेत्र" असे संबोधलेले आहे) क्षेत्रासाठी नियोजन प्रस्ताव तयार केलेला नाही, आणि उक्त क्षेत्र उक्त मिहान अधिसुचित क्षेत्रामधुन वगळण्यासाठी उक्त महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने दि. ६ ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या ५६ व्या बोर्ड मिंटिगमध्ये ठराव पारीत केलेला असुन, उक्त प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर केलेला आहे (यापुढे उक्त "ठराव" असे संबोधलेले आहे) ;

C:\2014-2015\Kalam\मिहान प्र.क्र.75-17.docx

आणि ज्याअर्थी, मौजे-शिवणगांव, जयताळा भामटी आणि इसासनी अनुक्रमे ता. नागपूर शहर आणि ता. हिंगणा येथील उक्त क्षेत्राची उक्त मिहान साठी उक्त महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस आवश्यकता नाही, असे शासनाचे मत झाले आहे ;

आणि आता, त्याअर्थी, शासन, उक्त अधिनियमाचे कलम ४० चे उप कलम (१ब), कलम १६० चे उप कलम (१), सह महाराष्ट्र जनरल क्लॉजेस अधिनियम, १९०४ चे कलम १६ व २१ अन्वये व या अनुषंगाने प्राप्त इतर अधिकारांचा उपयोग करुन-

१) सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद उक्त २२०.२१ हेक्टर क्षेत्र उक्त मिहान अधिसूचित क्षेत्रामधुन वगळून नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीमधील क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिका आणि नागपूर महानगर प्रदेश क्षेत्रासाठी नागपूर सुधार प्रन्यास नागपूरची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करत आहेत.

२) प्रस्तुत अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून उक्त क्षेत्रासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित हे विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून राहणार नाहीत.

प्रस्तुत अधिसुचना जनतेच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत एक महिन्यापर्यत उपलब्ध राहील.

१) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या. मुंबई, ८ वा मजला वल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड मुंबई-५

२) आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर.

३) सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर

४) विभागीय सहसंचालक नगररचना, नागपूर विभाग नागपूर.

सदर अधिसुचना शासनाच्या www.maharashstra.gov. या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे

*महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,*

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

(रा. शा. चौहान)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

C:\2014-2015\Kalam\मिहान प्र.क्र.75-17.docx

# परिशिष्ट

(शासन अधिसूचना क्र.टिपीएस-२४१६/शिकाना-४१/प्र.क्र.७५/२०१७/नवि-९ दि. २० एप्रिल, २०१७)

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | खालील गावातील उल्लेखित जागेचा समावेश | नियोजन प्राधिकरण / विशेष नियोजन प्राधिकरण |
|---|---|---|---|---|
| १ | नागपूर | नागपूर शहर | १) जयताळा (भाग)<br>२) भामटी (भाग)<br>३) शिवणगांव (भाग)<br>एकूण क्षेत्र = २१७.६६ हेक्टर | नागपूर महानगरपालिका |
| २ | नागपूर | हिंगणा | इसासनी (भाग)<br>क्षेत्र-२.५५ हेक्टर | नागपूर सुधार प्रन्यास |
| | एकूण क्षेत्र | | २२०.२१ हेक्टर | |

उपरोक्त अधिसूचित क्षेत्र व त्याच्या नकाशावर सिमा खालीलप्रमाणे आहेत.

**१. उत्तरेस -** जयताळा गाव सिमेलगत आणि ८३, ८४, ८५, ६७, ६८ आणि भामटी मधील सर्व्हे क्र. ६, ५, ४, १३

**२. पूर्वेस -** भामटी गाव सिमेलगत सर्व्हे क्र.८, ९-१०-३५ आणि जयताळा मधील ६९, ७०, ७१, ७२, १९४, १९५, १९७(भाग), १९८ (भाग)

**३. दक्षिणेस -** भामटी गांव सिमेलगत सर्व्हे क्र.३६ (भाग), ३७, ३८ (भाग), ४६ (भाग), ४० (भाग), ४१(भाग), १०८(भाग) आणि जयताळा मधिल सर्व्हे क्र. १९३, २०३(भाग), २०२(भाग), २०४(भाग), २१०(भाग), २०६(भाग), २०७ (भाग), २२५(भाग), १५९(भाग), १५७ (भाग), १५१(भाग), १५४(भाग), १५३(भाग), १४७(भाग),

**४. पश्चिमेस-** जयताळा गांव सिमेलगत सर्व्हे क्र.७३, १८५, १९४, १९२, १९१, १९०,१८९, १८१, १८२, १८३, २०५, १७०, १६१, १६०, १५८, १५६, १५५, १४६, १४०, भामटी मधील सर्व्हे क्र.७ (भाग), ३९, शिवणगांव मधील सर्व्हे क्र.२१(भाग) २०, १९, १(भाग), १/२ ka-११९/१ (भाग), २(भाग), ३(भाग), ७(भाग), ८(भाग), १४(भाग), १७, १८ आणि इसासनी मधील सर्व्हे क्र.१८

**टिप-** सदर परिशिष्टातील माहिती प्रस्तुत अधिसुचनेबाबत नकाशासह वाचावी.

*महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार.*

URBAN DEVELOPMENT DEPTT.
सत्यमेव जयते
MANTRALAYA, MUMBAI-32

(रा. शा. चौहान)
**कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन**

C:\2014-2015\Kalam\मिहान प्र.क्र.75-17.docx

# Government of Maharashtra
**Urban Development Department**
**Mantralaya, Mumbai 400 032.**
Date: 20th April, 2017

## NOTIFICATION

***Maharashtra Regional and Town Planning, Act, 1966.***

**No.TPS-2416/Shikana-41/CR-75/2017/UD-9:** Whereas, the Maharashtra Airport Development Company Limited (hereinafter referred to "the said Maharashtra Airport Development Company Limited") is a company incorporated under the Companies Act, 1956 and functions under the superintendence and control of the Government of Maharashtra;

And whereas, Government of Maharashtra in Urban Development Department notified an area admeasuring 5021.23 Hectare for Multi–Modal International Hub Airport at Nagpur (hereinafter referred to as "the said MIHAN") from the revenue villages of Nagpur Urban Taluka, Nagpur Rural & Hingna Taluka of the Nagpur District, for which Government has declared said MADC to be the "Special Planning Authority" as per the provision of sub-section (1B) of section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No.XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") ;

And whereas, Government of Maharashtra in Urban Development Department vide Notification No.TPS.2414/336/CR-230/2014/UD-9, dated 23rd December, 2014, deleted 739.41 Hectare area from the said MIHAN Notified area and appointed the Nagpur Improvement Trust to be Special Planning Authority for the deleted area, as per provisions of sub section (1) and (1B) of section 40 and sub section (1) section 160 of the said Act, read with section 16 & 21 of the Maharashtra General Clause Act, 1904 ;

And whereas, the said MADC has submitted the Planning Proposal for 4061.47 Hectare (excluding an area 220.21 hectare) to the Government in Urban Development for sanction vide letter dated 9th July, 2015 in pursuant of section 115 as substituted by clause (d) of sub Section (3) of section 40 of the said Act (hereinafter referred to as "the said Planning Proposal") for which the Government has accorded sanctioned vide Notification No.TPS-2415/255/CR-236/2014/UD-9, dated 1st March, 2017 in pursuant of section 115 as substituted by clause (d) of subsection 40 of the said Act. ;

And whereas, the said MADC has resolved in their 56 in Board Meeting dated 7th October, 2016, to de-notify the area admeasuring 220.21 Hectare, since the said MADC has not prepared any Planning proposal for this area (hereinafter referred to as "the said Area") from Mouza Shivangaon, Jaitala, Bhamati & Isasani and submitted the proposal to the Government for sanction ;

And whereas, the Government is of opinion that the said area from Mouza Shivangaon, Jaitala, Bhamati & Isasani villges are no more required for the said MIHAN by said MADC ;

Now therefore, in exercise of the powers conferred by section (1) and (1B) of section 40 and sub section (1) section 160 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah.XXX VII of 1966) read with section 16 & 21 of the Maharashtra General Clauses Act, 1904, and of all other powers enabling it is that behalf, the Government of Maharashtra hereby-

1) Deletes the said area from the MIHAN Notified area here in schedule appended and appoints the Nagpur Municipal Corporation as "Planning Authority", and Nagpur Metropolitan Area limit, Nagpur Improvement Trust as "Special Planning Authority".
2) Maharashtra Airport Development Company Limited, shall cease to be the Special Planning Authority for the said Area, form the date of publication of this Notification;

A copy of this Notification shall be kept open for inspection by the general public during office hours in the offices on all working days for a period of one month

1) The Vice Chairman and Managing Director, Maharashtra Airport Development Company Ltd. 8th Floor, World Trade Centre, Cafe Parade Mumbai-5
2) The Commissioner, Municipal Corporation Nagpur.
3) The Chairman, Nagpur Improvement Trust, Nagpur
4) The Joint Director of Town Planning Nagpur Division Nagpur.

This Notification shall be published on the Government website at **www.Maharashtra.gov.in.**

***By order and in the name of the Governor of Maharashtra.***

URBAN DEVELOPMENT DEPTT. सत्यमेव जयते MANTRALAYA, MUMBAI-32

(R.S. Chouhan)
**Desk Officer to Government**

C:\2014-2015\Kalam\मिहान प्र.क्र.75-17.docx

# SCHEDULE

(Accompaniment of Government Notification No. TPS-2416/shikana-41/CR-75/2017/Ud-9 dt. 20th April, 2017)

| Sr. No | District | Taluka | Area Comprised In the villages mentioned below | Planning Authority / Special Planning Authority |
|---|---|---|---|---|
| 1 | Nagpur | Nagpur Urban | 1) Jaitala (part)<br>2) Bhamti (part)<br>3) Shivangaon(part)<br>**Area = 217.66 Ha.** | Nagpur Municipal Corporation |
| 2 | Nagpur | Hingna | Isasani (part)<br>**Area = 2.55 Ha.** | Nagpur Improvement Trust |
| | **Total Area** | | **220.21 Ha.** | |

Boundaries of the aforesaid area as follows and shown in the plan attached:-

1) **To The North**:
   Passing through the village Jaitala along the boundary and under Survey Nos. 83, 84, 85, 67, 68, Villlage Bhamati along the boundary and under Survey Nos.6, 5, 4, 13.
2) **To the East**:
   Passing through the village Bhamati along the boundary and under Survey Nos.8, 9-10-35, Passing through the village Jaitala along the boundary and under Survey Nos. 69, 70, 71, 72, 194, 195, 196, 197(part), 198(Part)
3) **To the South**:
   Passing through the village Bhamati along the boundary and under Survey Nos.36 (Part), 37, 38(Part), 46(Part), 40(Part), 41(Part), 108(Part) village Jaitala along the boundary and under Survey Nos. 193, 203(part), 202 (Part), 204 (Part), 210(Part), 206 (Part), 207 (Part), 255(Part), 159 (Part), 157 (Part), 151 (Part), 154 (Part), 153 (Part), 147 (Part) ;
4) **To the West:**
   Passing through the village Jaitala along the boundary and under Srurvey Nos.73, 185, 194, 192, 191, 190, 189, 181, 182, 183, 205, 170, 161, 160, 158, 156, 155, 146, 140 village Bhamati along the boundary and under Survey Nos. 7(part), 39, Passing through the village Shivangaon along the boundary and under Survey Nos.21(Part), 20, 19, 1(Part), 1/2ka-199/1(Part), 2(Part), 3(Part), 7 (part), 8(part) 14(part), 17, 18 Village Isasani along the boundary and under Survey Nos. 18 ;

**Note**: This shall be read with the plan accompanying this Notification

***By order and in the name of the Governor of Maharashtra***

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

(R. S. Chouhan)
**Desk Officer to Government**

C:\2014-2015\Kalam\मिहान प्र.क्र.75-17.docx